# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक ०७/०५/२०२४ (मंगळवार) सकाळ**

---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपींविरूद्ध गुन्हा नोंद
## नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

दिनांक ०७/०५/२०२४ रोजी मा. श्री. अनिल म्हस्के सहाय्यक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर यांचे आदेशाने स्टाफ अवैध धंदयांवर रेडकामी पो. स्टे. केळवद हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना मौजा सावंगा ता. सौसर जि. पांढुर्णा मध्यप्रदेश येथुन दोन ट्रॅक्टरमध्ये रेती (गौणखनिज) ची अवैधरीत्या वाहतुक होवुन साईखेडा खुर्सापार मार्गाने पोस्टे केळवद हद्दीतील जोगा या गावाकडे जात आहे. अशा मिळालेल्या खबरेवरून स्टाफ यांनी नागपूर ते बैतूल महामार्ग क्र. ४७ रोडवरील जोगा फाटा येथे नाकांबदी केली असता दोन ट्रॅक्टर ट्रॉलीसह येतांना दिसले त्यांना थांबवून पाहणी केली असता ट्रॅक्टर क्र. MP-28/AD-4722 व ट्रॉली क्र. MH-49/BK-0181 चा चालक **आरोपी नामे– रितीक वामनजी शिंदे, वय २३ वर्ष, रा. सौसर जि. पांढुर्णा मध्यप्रदेश** याने आपल्या ताब्यातील ट्रॅक्टर ट्रॉली मध्ये ०१ ब्रास रेती २) ट्रॅक्टर क्र. MP-28/AC-1871 ट्रॉली क्र. MP-28/AC-2072 चा चालक **आरोपी नामे – भोजराज गुलाबराव मिरचे, वय ५५ वर्ष, रा. दोन्ही रा. सावंगा ता. सौसर जि. पांढुर्णा** याने आपल्या ताब्यातील ट्रॅक्टर ट्रॉली मध्ये ०१ ब्रास रेती अवैधरीत्या वाहतुक करतांना मिळुन आल्याने सदर ट्रॅक्टर चालकास ट्रॅक्टर मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता त्याने रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपीतांकडुन १) ट्रॅक्टर क्र. MP-28/AD-4722 किंमती ३५००००/–रू. ट्रॉली क्र. MH-49/BK-0181 किंमती १०००००/–रू. मध्ये ०१ ब्रास रेती (गौणखनिज) किंमती ४०००/–रू. २) ट्रॅक्टर क्र. MP-28/AC-1871 किंमती ३०००००/–रू. ट्रॉली क्र. MP-28/AC-2072 किंमती ७५०००/–रू. मध्ये अंदाजे ०१ ब्रास रेती (गौणखनिज) किंमती ४०००/–रू. मिळून आल्याने दोन्ही वाहनातील असे एकुण ०२ ब्रास रेती (गौणखनिज) किंमती ८०००/–रू. वाहनासह असा एकुण ८,३३,०००/–रू. चा मुद्देमाल जप्त करून आरोपींविरुद्ध कलम ३७९, ३४ भा.दं.वी. सहकलम ४८(८) महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये, ४, २१ खान खनिज अधिनियम अन्वये पो. स्टे केळवद येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, मा. सहाय्यक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर अनिल म्हस्के यांचे मार्गदर्शनात सफौ संजय उकंडे, पोहवा अनिल मुंढे, मपोहवा संगिता कोवे, पोशि नितेश पुसाम, मपोशि अश्विनी वांढरे यांनी केली.


पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर